तातडीचे

# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१,२,५ व ६, हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई-४०० ००१
☎०२२-२२०५७४०९ / २२०७२०९७ E-mail : mah-sforum@nic.in
Website : https://grahak.maharashtra.gov.in/

**वाचा** :- या कार्यालयाचे परिपत्रक क्र. राआ/महा./आस्था-३/परिपत्रक/२०१५/३४८४, दि.१२.०५.२०१५

जा.क्र.राआ/महा./आस्था-३/परिपत्रक/२०१५/३६८५ दिनांक १८ मे, २०१५

## -: शुध्दी पत्रक :-

राज्यातील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या कामकाजाबबत वरील दिनांक १२ मे, २०१५ च्या परिपत्रकाद्वारे दिशानिर्देश निर्गमित करण्यात आले असून त्यामध्ये खालील सुधारणा करण्यात येत आहेत.

१) वरील परिपत्रकातील क्र.१ चा मुद्दा **"महाराष्ट्र ग्राहक संरक्षण नियम, २००० च्या नियम क्र.६ (१) मधील तरतुदीनुसार जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या कामकाजाची भाषा मराठी असल्याने जिल्हा मंचासमोर दाखल होणा-या तक्रारी, जवाब, शपथपत्र, युक्तीवाद, अर्ज, इ. मराठी भाषेतूनच दाखल करुन घ्यावेत. परंतू इंग्रजी / हिंदीत दाखल केल्यास मंचाने वा दुस-या पक्षाने मागणी केल्यावर मराठी भाषांतर १५ दिवसांत पुरविण्याची हमी संबंधितांकडून घेण्यात यावी"**, याप्रमाणे वाचण्यात यावा.

२) वरील परिपत्रकात **"तक्रारअर्जासोबतची परिशिष्टे / जोडपत्रे / दस्तऐवज मुळ स्वरुपात दाखल करता येतील"**, हा मुद्दा परिपत्रकात क्र.५ वर अंतर्भूत करण्यात येत आहे.

वरील दिनांक १२ मे , २०१५ च्या परिपत्रकात उक्त क्र.१ व २ वर दर्शविलेल्या सुधारणांशिवाय बदल नाही.

आदेशान्वये,

(वि.प.पवार)
प्रभारी प्रबंधक विधी,
राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई

D:\SC MAH\DISTRCIT FORUM\DF work.doc

प्रतिलिपी :-

१) मा.न्यायिक सदस्य व मा.सदस्य, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र
२) मा.अध्यक्ष व मा.सदस्य, सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, महाराष्ट्र राज्य
३) मा.सचिव,अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
४) मा.सचिव, मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
५) प्रबंधक विधी, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, नागपूर व औरंगाबाद परिक्रमा खंडपीठ यांना कळविण्यात येते की, त्यांनी हे शुध्दीपत्रक त्यांचे कार्यालयातील सर्व संबंधितांचे निदर्शनास आणावे.
६) प्रबंधक, सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, महाराष्ट्र राज्य यांना कळविण्यात येते की, त्यांनी हे शुध्दीपत्रक त्यांचे कार्यालयातील सर्व संबंधितांचे निदर्शनास आणावे.
७) अधिक्षक आस्था, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी हे शुध्दीपत्रक या कार्यालयातील कर्मचा-यांचे निदर्शनास आणावे.

(वि.प.पवार)
प्रभारी प्रबंधक विधी,
राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई

*टिप :-* *हे शुध्दीपत्रक राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्राच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.*